**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**
गोराई-मनोरी-उत्तन या अधिसूचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून केलेली नियुक्ती रद्द करणेबाबत.....

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई :४०० ०३२.**
**दिनांक – १६ मार्च २०१७**

**क्रमांक :- टिपीबी ४३१६ / प्र.क्र.** २५७/ २०१६/ **नवि-११**

**शासन निर्णय :** सोबतची अधिसूचना शासनाच्या साधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(किशोर द. गिरोल्ला )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

**मा. मुख्यमंत्री महोदयांचे सचिव.**
**मा. राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांचे खाजगी सचिव.**

**प्रति,**

(१) **महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.**
(२) **महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका.**
(३) **महापालिका आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका.**
(४) **संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.**
(५) सह सचिव, तथा संचालक, नगर रचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
(६) उप संचालक, नगर रचना, बृहन्मुंबई.
(७) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
( त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे साधारण राजपत्रात प्रसिध्द करुन त्याच्या २५ प्रती नगर विकास विभाग (नवि-११), मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२ व उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांना पाठविण्यात याव्यात.)
(८) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग ( त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसूचना विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. )
(९) निवड नस्ती (नवि-११)

**Maharashtra Regional & Town Planning Act, 1966**

To cancel the appointment of MMRDA as Special Planning Authority for Notified area of Manori, Gorai(Municipal Corporation of Greater Mumbai) and Uttan, Pali, Chowk, Tarodi, Dongari (Mira Bhaynader Municipal Corporation ).

**GOVERNMENT OF MAHAHARASHTRA**
**Urban Development Department**
**Mantralaya, Mumbai 400 032.**
**Dated 16th March 2017.**

## NOTIFICATION

**No. TPB 4316/CR-257/2016/UD-11:**

Whereas, the Government of Maharashtra has appointed the Mumbai Metropolitan Region Development Authority (hereinafter referred to as its acronym "MMRDA") established under the Mumbai Metropolitan Region Development Authority Act, 1974(Mah. IV of 1975) to be the Special Planning Authority by the state Government in Urban Development Department's Notification No.TPB 4307/108/CR-29/07/UD-11 Dated 1st December 2007 promulgated in exercise of its powers conferred by sub-section (1) of Section 40 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966(hereinafter referred to as "the said Act") for the area of villages Manori & Gorai (Municipal Corporation of Greater Mumbai ) and Uttan, Pali, Chowk, Tarodi, Dongari (Mira Bhaynader Municipal Corporation) notified in the schedule of the said Notification (hereinafter referred to as " Notified Area "), to be developed as Recreation and Tourism Development Zone as per proposal of Sanctioned Regional Plan.

And whereas, the MMRDA as a Special Planning Authority has completed its obligatory duty to prepare a plan for the Notified area and submitted the same to the State Government for sanction under section 30 of the said Act.

And whereas, in exercise of its powers under sub-section (1) of Section 31 of the said Act, the Government of Maharashtra in Urban Development Department by its Notification No. TPB-4312/323/CR-23/2013/UD-11, dated the 13th May 2013 and dated the 3rd June 2016 has sanctioned the Development Plan of Notified Area (hereinafter referred to as "the said Plan") submitted by the MMRDA.

And whereas, as the Notified Area falls in the limit of Municipal Corporation of Greater Mumbai and Municipal Corporation of Mira Bhayander, and the concerned Municipal Corporations are implementing their sanctioned Development Plan as a Planning Authority, therefore to continue the appointment of MMRDA as a Special Planning Authority for implementation of the said Plan is no more required. The concerned Municipal Corporations shall implement the said plan along with their sanctioned Development Plans.

And whereas, the State Government is of the opinion that for effective implementation of the said Plan, the implementation shall be carried out by concerned Municipal Corporations as a Planning Authority as required as per the provisions of Section 42 of the said Act ;

Now therefore, the Government hereby cancels the appointment of MMRDA as Special Planning Authority for the notified area mentioned in the Schedule of the Notification No. TPB 4307/108/CR-29/07/UD-11 Dated 1st December 2007 and accordingly denotifies the said area to merge it, in the area of respective jurisdiction of the Municipal Corporation of Greater Mumbai and Municipal Corporation of Mira Bhaynader as Planning Authority(more particularly specified in the plan appended hereto).

The said Plan sanctioned by the State Government vide Notification dated 13th May 2013 and 3rd June 2016, shall be in force for the said area and it shall be duty of the Municipal Corporation of Greater Mumbai and Municipal Corporation of Mira Bhaynader to implement the said plan in their jurisdiction area.

The development permissions which have been already granted by MMRDA, shall be revalidated by Municipal Corporation of Greater Mumbai/Municipal Corporation of Mira Bhaynader and any change in the development permissions shall be dealt with in consultation with MMRDA.

Any modification to the sanctioned plan initiated by the Special Planning Authority and the notice under Section 37(1) of the said Act is published, the remaining procedure under Section 37 of the Act shall be completed by the Special Planning Authority to submit modification proposal to the State Government for sanction.

A copy of this Notification along with plan shall be made available for inspection for a period of one month at the following offices :--

a) Metropolitan commissioner, Mumbai Metropolitan Region Development Authority, Bandra-Kurla Complx, Bandra (East), Mumbai 400 051.
b) The Municipal Comnmissioner, Municiapl Corporation of Greater Mumbai.
c) The Municipal Commissioner, Municipal Corporation of Mirya Bhayander

The Notification shall also be available on the Govt. of Maharashtra website : www.maharashtra.gov.in

**By order and in the name of Governor of Maharashtra,**

**(Kishor D. Girolla)**
**Under Secretary to Government.**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**
गोराई-मनोरी-उत्तन या अधिसूचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून केलेली नियुक्ती रद्द करणेबाबत........

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
मंत्रालय, मुंबई: ४०० ०३२.
**दिनांक - १६ मार्च, २०१७**

**क्रमांक :- टिपीबी ४३१६/प्र.क्र.२५७/२०१६/नवि-११**

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ (१९७५ चा महा. ४ था ) अन्वये स्थापन झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (यापुढे याचा उल्लेख "एमएमआरडीए" असा बहुउद्देशीय नावातील सुरवातीची अक्षरे घेऊन केलेला आहे), महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा केलेला आहे) चे कलम ४० च्या पोटकलम १ अन्वये शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीबी ४३०७/१०८/प्र.क्र.२९/०७/नवि-११, दिनांक १.१२.२००७ अन्वये मौजे मनोरी, गोराई (बृहन्मुंबई महानगरपालिका हद्द ) आणि उत्तन, पाली चौक, तारोडी, डोंगरी या सदर अधिसूचनेमध्ये उल्लेखिलेल्या क्षेत्रासाठी (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिसूचति क्षेत्र" असा केलेला आहे), मंजूर प्रादेशिक योजनेच्या प्रस्तावानुसार मनोरंजन आणि पर्यटन विकास विभागाच्या विकासासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, एमएमआरडीए ने उक्त अधिनिमाच्या तरतुदीनुसार विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने उक्त अधिसूचना क्षेत्राचा आराखडा तयार करण्याचे कर्तव्य पार पाडून तसा आराखडा उक्त अधिनियमाचे कलम ३० अन्वये शानास सादर केलेला होता ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३१ च्या पोटकलम (१) अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन राज्य शासनाने एमएमआरडीए ने सादर केलेल्या उक्त अधिसूचित क्षेत्राच्या विकास आराखडयास नगर विकास विभागाकडील क्रमांक सिएमएस/टिपीबी-४३१२/प्र.क्र.२३/२०१३/नवि-११ दिनांक १३ मे २०१३ व दिनांक ३ जून २०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये मंजूरी दिलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचित क्षेत्र हे बृहन्मुंबई महानगरपालिका व मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये समाविष्ट आहे आणि सदर महापालिका नियोजन प्राधिकरण म्हणून त्यांच्या मंजूर विकास योजनांची अंमलबजावणी करीत आहे. संबंधित महानगरपालिका त्यांच्या मंजूर विकास योजनेप्रमाणे

उक्त विकास योजनेची अंमलबजावणी करु शकणार आहेत. त्यामुळे एमएमआराडीए ची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती कायम ठेवणेचे प्रयोजन रहात नाही ;

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाचे असे मत झालेले आहे की, उक्त विकास योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी त्यांची अंमलबजावणी उक्त अधिनियमाच्या कलम ४२ च्या तरतूदीनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणाने करणे अभिप्रेत असल्याने त्यांच्या अधिकाराक्षेत्रामध्ये संबंधित महानगरपालिकांकडे नियोजन प्राधिकरण म्हणून सोपविणे आवश्यक आहे ;

आणि त्याअर्थी, शासन, अधिसूचना क्र. टिपीबी ४३०७/१०८/प्र.क्र.२९/०७/नवि-११, दिनांक १.१२.२००७ मध्ये उल्लेखिलेल्या अधिसूचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची नियुक्ती रद्द करीत असून सदर क्षेत्र अधिसूचित क्षेत्रामधून वगळून संबंधित बृहन्मुंबई महानगरपालिका व मिरा भाईंदर महानगरपालिकांच्या हद्दीमध्ये अंतर्भूत असलेप्रमाणे नियोजन प्राधिकरण असलेल्या त्यांच्या क्षेत्रामध्ये (यासोबत जोडलेल्या नकाशामध्ये विशेषत्वाने उल्लेखिलेप्रमाणे ) अंतर्भूत करणेत येत आहे;

राज्य शासनाने दिनांक १३ मे २०१३ व दिनांक ३ जून २०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये सदर क्षेत्रासाठीची मंजूर केलेली उक्त विकास योजना अंमलात रहाणार असून त्यांची अंमलबजावणी त्यांच्या अधिकार क्षेत्रामध्ये करणे हे बृहन्मुंबई महानगरपालिका व मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे आवश्यक कर्तव्य राहणार आहे.

यापूर्वी एमएमआरडीए ने दिलेल्या विकास परवान्यांचे पुनर्वेधन बृहन्मुंबई महानगरपालिका व मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडून करणेत येईल व त्यामध्ये काही बदल करावयाचा असल्यास तो एमएमआरडीए च्या सल्ल्याने करणेत येईल.

प्रस्तुत अधिसूचनेची प्रत त्यासोबतच्या नकाशासह खाली उल्लेखिलेल्या कार्यालयामध्ये एका महिन्याचे कालावधीसाठी अवलोकनार्थ उपलब्ध राहील.

१) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण वांद्रे-कुर्ला संकूल, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१.

२) महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका.

३) महापालिका आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका.

सदर अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(किशोर ब. गिरोल्ला)

शासनाचे अवर सचिव